दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार ३ मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २६० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# तुम्ही कफन चोर, आता तुमचे घोटाळे: देवेंद्र फडणवीस यांचा घणाघात

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी आज शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. "महाराष्ट्र दिनानिमित्त शुभेच्छा देतो. महाराष्ट्रमध्ये विकास होईल अशी प्रार्थना करतो. काँग्रेसने आपल्यावर अन्याय केला आहे. काँग्रेस हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरेंनी जाहीरपणे सांगितलं होतं की ज्या दिवशी काँग्रेस सोबत जाण्याची वेळ माझ्यावर येईल, माझ्या शिवसेना नावाचं दुकान हे मी बंद करून टाकेन. आता बाळासाहेब ठाकरे यांच्या आत्म्याला काय वाटत असेल? प्रॉपर्टीचे मालक उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे असतील. पण विचारांचे मालक



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत", असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला. चुकीच्या गोष्टी आपल्याला सांगतात. काय सांगतात? महाराष्ट्राचे उद्योग गुजरातला चालले? खरं म्हणजे महाराष्ट्राची ताकदच उद्धव ठाकरे आणि त्यांच्या चेल्याचपाट्यांना माहिती नाही. या महाराष्ट्राची क्षमता काय आहे हे त्यांना माहित आहे का? मी त्यांना सांगतो, उद्धवजी ज्यावेळी या महाराष्ट्रामध्ये या सगळ्या लोकांच्या आशीर्वादाने भारतीय जनता पार्टी आणि महायुतीचं सरकार आलं तेव्हा मोदीजींचा आशीर्वाद होता. आम्ही 2015 पासून 2019 पर्यंत सातत्याने परकीय थेट गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आणण्याचे काम केलं. देशात आणि राज्यात काँग्रेसचं सरकार होतं तेव्हा गुंतवणूकमध्ये चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर होता", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## 'तुम्ही कफन चोर, आता तुमचे घोटाळे...'

"तुम्ही गुंतवणूकबाबत अडीच तीन वर्ष रडत होते. माझा सवाल आहे, 25 वर्ष महानगरपालिका तुम्ही बोलाल तशी चालली, तुम्ही नेमकं काय दिलं? ते सांगा. या पंचवीस वर्षांमध्ये तुम्ही मुंबईला काय दिलं? मोदींचं राज्य आलं. मोदींनी स्टार्टअप पॉलिसी आणली. महाराष्ट्रामध्ये आम्ही स्टार्टअप पॉलिसी आणली. मला असं वाटतं. तुम्ही ज्याच्या सोबत राहता त्यांची सवय तुम्हाला लागली. आता हे अध्यक्ष आहेत का गल्लीचे नेते आहेत?", असा टोला फडणवीसांनी लगावला. "कोणाचा बाप आला तरी मुंबईला महाराष्ट्रापासून तोडू शकत नाही. जोवर चंद्र आहे तोवर मुंबई महाराष्ट्राचीच असणार. तुम्ही कफन चोर आहेत. आता तुमचे घोटाळे बाहेर काढलेत, आगे देखो होता है क्या", असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

# पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मताचा पाऊस बजरंग सोनवणेवर पडणार - कवडे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील शेतकरी इंडिया महाविकास आघाडीच्या बाजूने मत करणार असे शेतकरी नेते गणेश कवडे यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकार द्वारे सांगितले. भाजप सरकारच्या काळामध्ये शेतकरी आर्थिक दृष्ट्या पूर्णपणे खचला आहे खताचे भाव गगनाला पोहोचले परंतु मालाचे भाव कमी करून शेतकऱ्यावर एक प्रकारे अन्याय केला कांदा या पिकाला निर्यात बंदी केली, सोयाबीनचे भाव वाढू नयेत याची प्रमाणिक काळजी घेतली, डिझेल ६० रुपयावरून १०० वर नेले याचा परिणाम शेतकऱ्याच्या आर्थिक नियोजनावर झाला. नांगरट १२०० वरून २००० भाव झाला पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मताचा पाऊस बजरंग सोनवणेवर पडणार - कवडे शेतात पाळी घालण्यासाठी ४०० रुपये एकरी वरून १००० रुपयांवर गेली, पेरणी ७०० वरून १५०० वर गेली, महिलांसाठी गॅस टाकीची योजना आणून प्रत्येक घरामध्ये गॅस टाकी दिली आणि त्याचा भाव ४०० वरून ११०० नेला, दैनंदिन जीवनामध्ये जीवनावश्यक लागणाऱ्या वस्तूवर जीएसटी बसवली, सोन्याचा भाव ४००० वरून ७८०० वर गेला शेतकऱ्यांना मुला बाळांच्या लग्नामध्ये सोनं घेणं अशक्य झालं हे सरकार शेतकऱ्याच्या बाजूच नसून भांडवलदार लोकांच आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी निर्णय घेतला इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्यावर मताचा पाऊस पडणार असे शेतकरी नेते



गणेश कवडे यांनी सांगितले.

## आंबेजोगाई येथील आज होणा-या प्रकाश आंबेडकरांच्या सभेमुळे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांच्या विजयावर होणार शिक्का मोर्तब

बीड( प्रतिनिधी ) वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा प्रचार सर्वात आघाडीवर असून आज अंबेजोगाई येथे प्रकाश आंबेडकर यांची जाहीर सभा होत आहे आंबेडकर यांच्या सभेने वंचित बहुजन आघाडी चे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या विजया वर शिक्का मोर्तब होणार आहे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचाराने बीड जिल्यात चांगलीच ग्रीप घेतली असून गावा गावात निवडून येणार गॅस सीलेंडर बाकी होणार सरेंडर अशा घोषणा गावा गावातील कार्यकर्ते देताना दिसत आहेत

# दुगाव येथे श्रीकृष्ण विवाह सोहळा संपन्न...

**वादळवार्ता/बिलोली**

नांदेडच्या बिलोली तालुक्यातील दुगाव येथे चालत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यातील सोहळ्यातील श्रीकृष्ण विवाह सोहळ्याचा प्रसंग आज दिनांक एक मे रोजी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला यात गावातील चिमुकल्याने श्रीकृष्ण वधू-वरांची भूमिका साकारली चिमुकल्याणी पारंपारिक वधूवरांच्या वेशभूषेत सहभागी होते यात गावातील वधू पक्ष वराडी व वर पक्ष वराडी म्हणून डोक्यावर फेटा व अगदी थाटामाटात वधु वर मंडळी मंडपात सहभागी होते या अभूतपूर्व श्रीकृष्ण विवाह सोहळा पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी झाली होती या श्रीमद भगवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे निरूपण ह भ प सुनील महाराज अष्टीकर यांच्या रसाळ अमृतवाणीतून झाला या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यानिमित्त दुगाव पंचक्रोशीतील हजारो भाविक सहभागी होते श्रीकृष्ण विवाह सोहळा पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती भाविकांनी मंत्रमुग्ध होऊन श्रीकृष्ण विवाह सोहळ्यात सहभागी झाले होते श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन समस्त गावकरी मंडळ दुगाव तालुका बिलोली जिल्हा नांदेड यांच्या वतीने करण्यात आलं होतं हनुमंत चंदनकर नांदेड



# अंबाजोगाई येथे होणा-या बाळासाहेब आंबेडकर यांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहा-शहराध्यक्ष बाबा मस्के

**वादळवार्ता/बीड**

वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटीलयांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई येथे दिनांक ३ मे २०२४ रोजी ठीक सायं.५-०० वाजता मोंढा मैदान अंबाजोगाई येथे वंचित बहुजन आघाडीचे पक्षाध्यक्ष ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या भव्य सभेचे आयोजन करण्यात आले आहे.तरी केज मतदार संघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे केज शहराध्यक्ष बाबासाहेब मस्के,उत्तम वाघमारे,दत्ता व्यवहारे,सलीम तांबोळी यांनी केले आहे. बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांची उमेदवारी घोषित केल्यापासून पहिल्यांदाच ते बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर हे येत आहेत.देशाचे संविधान व लोकशाही धोक्यात आली असून देशाचे संविधान व लोकशाही वाचविण्यासाठी ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर हे अहोरात्र काम करत आहेत.ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे





हात बळकट करण्यासाठी व त्यांचे विचार ऐकण्यासाठी केज मतदार संघातील सुजाण नागरिकांनी मोठ्या संख्येने सभेला उपस्थित राहावे.

संपादकीय

# जय जय महाराष्ट्र माझा!

महाराष्ट्र एक असा राज्य आहे ज्याला लाभलेला आहे गौरवशाली परंपरेचा इतिहास. महाराष्ट्रातील लोकांची जीवनशैली भलेही साधी पण आहे खूप खास. जोपासली जाते येथे भावना विश्वबंधुत्वाची जरी असली विविधता भाषा, पोशाख आणि परंपरेची, आचार-विचार, संस्कृतीची. महाराष्ट्रातील प्रादेशिक विभाग, प्रत्येक प्रादेशिक विभागांमध्ये बोलल्या जाणाऱ्या बोली भाषेचा बदलणारा तोरा किंवा अंदाज : मराठी मायबोलीचा मवाळपणा, मालवणी भाषेतील मधुर पणा, कोकणी भाषेतील कातरपणा, खाडी भाषेतील खट्याळपणा पोषाखाचे आहे वैशिष्ट्य आगळे फुल शर्ट सोबत धोतर आणि फेटा, नऊवारी साडी, नाकात मोत्याच्या नथीचा वेगळाच थाट , पंगतीला बसायला सागवानी पाठ, येणा जाणारांन हात जोडून कधी नमस्कार ,कधी राम राम अशी असते भेट. जिभेचे चोचले पुरवतात फार कधी मटकी उसळ,थालीपीठ, वडापाव, उपीट, शिरा, कांदापोहे, मुगाची खिचडी, झुणका भाकर तर कधी पुरणपोळी, हिरव्या मिरचीचा खर्डा, कोशिंबीर, पापड, लोणचे,उकडीचे मोदक साबुदाण्याची खिचडी. घशाची खवखव घालवते कधी आल्याचा चहा, गवती चहा, कधी कॉफी, गर्मी मधे थंडावा म्हणून कधी ताक, कढी, कधी लिंबू शरबत तर कधी गंजी आणि सोलकढी. क्रीडांगणावर रंगते कधी क्रिकेट ची मॅच, कधी कबड्डी, खो-खो, कुस्ती कधी विटू दांडी आणि पकडापकडी तर कधी लपंडाव या साऱ्यांची तर मजाच एकदम आगळी राव. मनोरंजनातून मन रमविते भारुड, भूपाळी, पोवाडा, लावणी, नाट्यसंगीत, कोळी डान्स, उखाणे, लोक गीते, जात्यावरची गाणी या साऱ्यांची बाई न्यारी कहाणी. नाट्यसंगीता मधूनी सीता स्वयंवर, शाकुंतल, मत्स्यगंधा, रामराज्य वियोग अजरामर झाला संगीत शारदा, देवमाणूस, एकच प्याला. भारूडातून प्रकाशात आणले काही व्यंग आणि केली समाज जागृती, जनजागृती. भूपाळी ही सकाळ सायंकाळ प्रेरित करते अध्यात्मिकतेची ओढ लावते. पोवाड्यातून गायली जाते समाजसुधारकांची यशोगाथा आणि वीरगाथा. लावण्या मधून माणसाच्या वाहतात भावना.उखाण्यातून कुशलतेने सांगते कुटुंबाचा परिचय. महाराष्ट्राच्या मातीत जन्मले थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले, न्यायमुर्त गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज. महिला समाज सुधारक ही होऊन गेल्या काही अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे आणि पंडिता रमाबाई सार्यांची कामगिरी अजरामर त्यांना अजरामर केली. 'महाराष्ट्र दिन" दिवस हा आहे उत्सवाचा. हे राज्य जिथे जन्म झाला एका वाघाचा. वचनाला प्राणापेक्षा जास्त मानणाऱ्या शिवाजीचा, जिजा माऊलींच्या शिवबाचा. ज्याने घेतला होता ध्यास फक्त आणि फक्त स्वराज्याचा. महाराष्ट्र ही आहे पुण्यभूमी जिथे अवतरले शिर्डीचे साईबाबा, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, पंढरपूरचे विठोबा , शेगाव चे गजानन महाराज, सोलापूरचे सिद्धेश्वर महाराज याशिवाय लाभले दैवत सिद्धिविनायक, तुळजाभवानी, त्रंबकेश्वर गुरुदेव दत्त, हाजी अली, महालक्ष्मी, मुंबादेवी आणि खंडोबा

महाराष्ट्रात वसलेल्या किल्ल्यांची अनोखी कलाकृती त्यातील काही अप्रतिम साकारलेली किल्ले म्हणजे शिवनेरी,रायगड, , प्रतापगड, सिंहगड इत्यादी. महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या माणसाचे वैशिष्ट्य म्हणजे साधी भोळी सरळ माणसे, तीक्ष्ण बुद्धि, दूरदृष्टी ठेवणारी, परोपकारी, जेवढी मवाळ तेवढीच जहाल. कोणाच्या वाटेला जाणार नाही त्यांच्या वाटेला कोण आलं

# कर्मचा-यांचे भविष्य समृद्ध करणार - संजयबाबा घाटगे
## अन्नपुर्णा कारखान्यावर कामगारदिन साजरा

**वादळवार्ता/कुडूत्री**

आमच्या विविध संस्थेमध्ये काम करणा-या प्रत्येक संस्थेचा कर्मचारी कसा सुखी होईल यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. संस्था सदृढ झाल्या तरच कामगार वर्ग सदृढ होवू शकेल सर्वांच्या योगदानाशिवाय उत्पादन व त्याची गुणवत्ता याचा ताळमेळ बसणार नाही त्यामुळे कामगारांचे योगदान व प्रामाणिकपणा अत्यंत महत्वाचा आहे. कर्मचा-यांचे हित डोळ्यासमोर ठेवून माझे समाजकार्य आजही सुरू असून प्रत्येक घटकातील कर्मचा-यांचे भविष्य समृद्ध करण्याचा माझा मानस आहे असे प्रतिपादन अन्नपुर्णाचे संस्थापक चेअरमन संजयबाबा घाटगे यांनी केले. केनवडे ता.कागल श्री अन्नपुर्णा शुगर कारखाना लि. येथे १ मे आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी कामगार दिनानिमित्त हुतात्म्यांना अभिवादन करून सर्वांना महाराष्ट्रदिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

गोकुळचे संचालक अंबरिषसिंह घाटगे म्हणाले, योग्य मार्गदर्शनाखाली आमच्या सर्वच संस्था आदर्शवत कार्यरत आहेत. पुढील काळातही आमचे एकच ध्येय असणार आहे ते म्हणजे सर्व संस्थेशी संबधीत असणारे सर्व घटक प्रामुख्याने कर्मचारी सुखी झाला पाहिजेत यासाठी सदैव माझे प्रयत्न राहणार आहेत. चिफ केमिस्ट सुनिल कोकीतकर म्हणाले, संजयबाबा घाटगे हे निडर,निःस्पृह आणि निस्वार्थी व्यक्तीमत्व असणारी व्यक्ती आहे. शिवाय गुळपावडर सारखा कारखाना काढून तो यशस्वीपणे चालवणे इतके सोपे नसताना या प्रत्येक बाबतीत अभ्यासपुर्ण, बारकाईने लक्ष घालून कारखाना काटकसरीने कसा चालेल व अधिक अधिक उत्तम प्रतिचे उत्पादन कसे घेता येईल याकडे विषेश लक्ष ते देतात.

कारखान्याचे चिफ इंजिनिअर राजू मोरे, म्हणाले अन्नपुर्णा संस्थेतून मिळणारा फायदा हा सर्वसामान्य कामगारांना व कष्टक-यांना मिळावा हि लोकभावना असणारे व्यक्तीमत्व म्हणजे अन्नपुर्णा समुहाचे सर्वेसर्वा संजयबाबा घाटगे होय. अन्नपुर्णा च्या माध्यमातून लावलेल्या रोपाचे आता वटवृक्षामध्ये रूपांतर होत असून त्याचा फायदा सर्वांना निश्चितच मिळणार आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास चिफ फायनान्स मॅनेजर शामराव चौगले,सिव्हील इंजिनिअर हंबीरराव पाटील,शेती अधिकारी



श्रीनिवास कुलकर्णी,सुरक्षा अधिकारी विष्णू पाटील,विरेन घाटगे, कृष्णात कदम,विनायक चौगले,आकाराम बचाटे,जे.एन.पाटील,तानाजी कांबळे,दत्तोपंत वालावलकर,शामराव पोवार,अशोक पाटील,महेश देशपांडे,विश्वास पाटील, अन्नपुर्णा समुहातील संस्थेचे संचालक, पदाधिकारी कर्मचारी उपस्थित होते. स्वागत सागर लोहार यांनी केले आभार प्रा.सुभाष पाटील यांनी मानले.

# श्री ह.भ.प.गु.श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या अमृततुल्य श्रीमद्भागवत कथेस हर्षोल्लासात आरंभ

**बीड प्रतिनिधी**

बीड -(प्रतिनिधी) श्री क्षेत्र महर्षी गौतम ऋषी संस्थान पालवणचे महंत श्री ह.भ.प.गु.श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या अमृततुल्य श्रीमद्भागवत कथेस बीड तालुक्यातील काकडहिरा येथे मोठ्या हर्षोल्लासात आरंभ झाला.सात दिवस चालणाऱ्या या श्रीमद्भागवत कथेचे आयोजन समस्त ग्रामस्थ काकडहिरा गावातील भाविकांनी केले आहे.

भागवताचार्य श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या रसाळ व गोड वाणीतून शब्द शब्द श्रवण करतांना भाविक अक्षरशः मंत्रमुग्ध होत आहेत.डोंगरे महाराजांची अमोघ वक्तृत्व शैली, भावपूर्ण निरूपण, शब्द सामर्थ्याची अपार देणगी, सखोल चिंतन, प्रसंगानुरूप आविष्कार यामुळे कथा ऐकतांना मन अष्ट सात्विक भावांनी दाटून येते.

पहिल्याच दिवशी कथेचे महात्म्ये व फल वर्णन करताना श्रोते मंत्रमुग्ध व अंतर्मुख होऊन गेले.श्रीमद्भागवत कथा का श्रवण करावी? कोणी श्रवण करावी? केव्हा श्रवण करावी? कलियुगात कथा श्रवण किती महत्त्वाचे आहे? याविषयी अतिशय अभ्यासपूर्ण



निरूपण महाराजांनी केले.कथेसाठी संगीतसाथ सिंथवादक व गायनाचार्य प्रल्हाद महाराज समगे, संगीत विशारद श्रीराम महाराज चव्हाण, गायनाचार्य एकनाथ महाराज उगले तबला वादक लग्न महाराज यांची आहे.काकडहिरा, तळेगाव,पालवण,वरवटी,गवळवाडी, बीड येथील भाविक कथा श्रवण करण्यासाठी येत आहेत.दररोज सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले जात आहे.

# शैक्षणिक चळवळीत राधानगरी तालुक्याचे योगदान मोलाचे : वर्षा केनवडे

## क!!तारळेत शिक्षक समितीचे त्रैवार्षिक अधिवेशन संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**कुडूत्री /सुभाष चौगले**

राधानगरी तालुका हा दिशादर्शक तालुका म्हणून ओळखला जातो. कोणतेही शैक्षणिक चळवळ व ऐतिहासिक वारसा याच तालुक्यातून सुरू होतो. असे प्रतिपादन शिक्षक समितीच्या महिला राज्याध्यक्ष सौ.वर्षा केनवडे यांनी केले.

त्या पुढे म्हणाल्या " शिक्षकांचे संघटन गरजेचे असून आपणच आपले प्रश्न शासन दरबारी मांडू शकतो यासाठी ज्येष्ठ शिक्षक नेत्यांचे मार्गदर्शन मोलाचे आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ शिक्षक नेते बंडोपंत भाऊसो किरुळकर हे होते.

सुधाकर सावंत म्हणाले की, शिक्षकांनी भविष्यातील प्रश्नांचा वेध घेत संघटन मजबूर करायला हवे शासकीय मानसिकतेतून तयार झालेल्या प्रश्नांच्या सोडवनुकीसाठी प्रसंगी संघर्ष करायला हवा.

कार्यक्रमात राजनजी कोरगावकार ,बंडोपंत किरुळकर, प्रमोद तौदकर,बाळासो पोवार, अर्जुन पाटील, विक्रम वागरे, आदींनी आपली मनोगते व्यक्त केलीत.

प्रारंभी कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन राजनजी कोरगावकर,सौ. वर्षा केनवडे राजेंद्र कुमार पाटील, ज्योतीराम पाटील, बंडोपंत किरुळकर आदींच्या हस्ते संपन्न झाले.कार्यक्रमात शिक्षक समितीच्या नवनिर्वाचित व मावळत्या कार्यकारणीचा सत्कार समारंभ फेटा पुष्पगुच्छ देऊन संपन्न झाला.

कार्यक्रमास सुधाकर सावंत (राज्याध्यक्ष मनपा विभाग) शिक्षक नेते जोतिराम पाटील,राजेंद्र कुमार पाटील चेअरमन शिक्षक बँक व राज्य संघटक), अर्जुन पाटील (पुणे विभागीय अध्यक्ष)प्रमोद तौदकर (जिल्हाध्यक्ष शिक्षक समिती),बळवंत पोवार (माजी अध्यक्ष शिक्षण समिती राधानगरी) विक्रम वागरे (अध्यक्ष शिक्षक समिती) राधानगरी आदि प्रमुख उपस्थितासह मधुकर मुसळे,विठ्ठल भाट ,उमेश देसाई, हरिदास वर्णे, गणपती मांडवकर, प्रकाश कांनकेकर,शाहू चौगले, मारुती पाटील, बाजीराव पाटील, संजय भोपळे, रवींद्र बोडके,तानाजी पाटील,संजय जांगनुरे, संजय चरापले, उत्तम फराकटे, नारायण आयरे, संजय कुंभार, विलास मुसळे, आर.जी. पाटील, पि.के. पाटील, सुरेश पाटील, संतोष पाटील, विकास पाटील, सौ विजया कदम पाटील,सौ.शैलजा कांनकेकर आदी शिक्षक समितीचे सर्व पदाधिकारी, शिक्षक वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रकाश कांनकेकर यांनी सूत्रसंचालन प्रकाश पाटील, विक्रम पाटील यांनी तर आभार मधुकर मुसळे यांनी मांनले.

### शिक्षक समितीला दहा हजार सत्कार निधी

**कार्यक्रमात शिक्षक समितीला दहा हजारांचा निधी शिक्षक समितीचे कोषाध्यक्ष शिक्षक संतोष पाटील कसबा वाळवे यांनी सुपूर्द केला.हा निधी तालुक्यातील प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये सातवी व चौथी परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमास उपयोगी येणार आहे.**

# घरासमोर रांगोळीतून तुतारी रेखाटत महिलांकडून बजरंग बप्पा सोनवणेंचे स्वागत

## गेवराई तालुक्यात महिलांचा असा ही प्रचार

**वादळवार्ता/गेवराई**

गेवराई तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून त्यांना चांगली पसंती मिळाली आहे. गावा - गावात बैलगाडीतून, दुचाकीवरून रॅली काढून तर उघड्या जीपमधून मिरवणूक काढून त्यांचे निवडणूक चिन्ह तुतारी वाजवून स्वागत होत असताना आता सर्व सामान्य महिला घरासमोर रांगोळीतून "तुतारी" हे चिन्ह रेखाटून बजरंग बप्पांचा प्रचार करताना दिसून येत आहे.

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यासह यांनी माजी मंत्री बदामराव पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजाताई मोरे, पंढरीनाथ लगड, युवा नेते युध्दजित पंडित, महेश बेदरे, अमोल करांडे, आबा दाभाडे यांच्यासह मित्र पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी गेवराई तालुका पिंजून काढून प्रचारात आघाडी घेतली आहे. कुठलाही राजकीय वारसा नसताना सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील उमेदवार म्हणून बजरंग बप्पा सोनवणे यांना पसंती मिळत आहे.

बजरंग बप्पा सोनवणे यांची मराठा, धनगर, मुस्लिम आरक्षणासह संविधान वाचविण्याची भूमिका, प्रत्येक तालुक्यात रोजगार निर्मितीसाठी नवीन प्रकल्प आणणे, रेल्वे मार्गाचे काम पूर्ण करणे ही कामे प्राधान्याने करण्याचे त्यांचे धोरण, कांदा, कापूस, सोयाबीन, तूर, हरबरा या पिकांवरील निर्यातबंदी उठवून शेतकऱ्यांना हमीभाव व शेतीमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी आवाज उठवून शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडविणे हा त्यांचा ध्यास असल्याची भूमिका मतदारांसमोर मांडत आहेत. तर भाजपच्या विद्यमान खासदार, माजी पालकमंत्री व विद्यमान पालकमंत्री यांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी दूरदृष्टी ठेवून कुठल्याही प्रकारचे प्रकल्प न आणल्याने तरुणांची बेरोजगारी वाढली असून विकास निधी खर्च न केल्याने अनेक विकास कामे प्रलंबित राहिल्याचे मतदारांसमोर मांडत आहेत. विरोधी मुंडे भाऊ - बहिणी या त्यांच्या स्वार्थासाठी जिल्ह्यात जातीवादाचे विषवल्ली पेरून मते कशी मिळविता येतील. यासाठी धडपड करीत असल्याचे लोकांना प्रचारातून पटवून देत आहेत. त्यामुळे गेवराई तालुक्यातील सर्व समाजातील मतदारांकडून त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असून प्रचारासाठी दाखल होताच बैलगाडीतून, दुचाकीवरून रॅली काढून तर उघड्या जीपमधून मिरवणूक काढून त्यांचे निवडणूक चिन्ह तुतारी वाजवून स्वागत करीत आहेत. तर आता सर्व सामान्य महिला या आपापल्या घरासमोर रांगोळीतून "तुतारी" चिन्ह व बजरंग बप्पा सोनवणे हे महाराष्ट्राच्या भविष्यासाठी एकमेव पर्याय असल्याचे रेखाटून बजरंग बप्पांचा असा प्रचार करू लागल्या आहेत.

### गेवराई तालुक्यात बजरंग बप्पांना पसंती

राज्याच्या आणि देशाच्या विकासात शरदचंद्र पवार यांचा असलेला सिंहाचा वाटा, देशात सर्वांना समान संधी व समान न्याय मिळावा म्हणून काँग्रेस पक्षाची भूमिका तर राज्यात अडीच वर्षाच्या कार्यकाळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोना सारख्या महामारीत हाताळलेला परिस्थिती. या गोष्टीचा विचार करीत इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पाठीशी मतदार उभे राहून त्यांना समर्थन व पसंती देत असल्याचे चित्र गेवराई तालुक्यात दिसून येत आहे.

# यात्रेनिमित्त शुभांगीताई घरत यांनी शांतादेवीला केले सोन्याचे मंगळसूत्र अर्पण!

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

सालाबादप्रमाणे गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर गावातील यात्रोत्सवाला गुरुवार दि.२ मे २०२४ रोजी देवीच्या पूजाअर्चेने भल्या पहाटे सुरुवात झाली. संपत्ती किती कमावली यापेक्षा संपत्ती किती गरजुना कामी आली याला महत्व देणाऱ्या, यमुना सामाजिक -शैक्षणिक संस्थेच्या सरचिटणीस,सामाजिक कार्य आणि परोपकारी कार्यासाठी सदैव अग्रेसर असणारे कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या अर्धांगिनी शुभांगीताई घरत यांनी तब्बल १४ तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र देवीच्या चरणी अर्पण केले.

शेकडो वर्षांची परंपरा शांतादेवी यात्रेला आहे,अनेक वर्ष जहागीरापासून पूर्वापार




दागिने शांतादेवी साठी वापरले जात आहेत. धार्मिक वृत्तीच्या शुभांगीताईनीं पि.एन.जि. ज्वेलर्सच्या माध्यमातून एक सुंदर डिझाईनचे मंगळसूत्र शांतादेवीसाठी घडविले व आज त्याचे अर्पण शुभांगीताई घरत यांच्या हस्ते यात्रेच्या शुभमुहूर्तावर करण्यात आले.

मागच्याच महिन्यात शुभांगीताई घरत यांनी आपल्या उत्पन्नातील काही भाग अर्थसहाय्य म्हणून त्या ज्या दापोली माध्यमिक विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आहेत त्या न्यू इंग्लिश स्कूल दापोली पारगाव विद्यालयाला तब्बल पंचवीस लाख रुपयांची देणगी दिली आहे. आपले दानशूर सासरे स्वर्गीय तुकाराम बुवा घरत ज्यांनी सन १९६५ साली श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय गव्हाण शाळेच्या उभारणीसाठी भरीव आर्थिक मदत केली होती. शुभांगीताई यांचे पती महेंद्रशेठ घरत ज्यांचे सर्व क्षेत्रातील दानशूरते बाबत आदर्श नाव घेतले जाते त्यांचा दानशूरतेचा वारसा पुढे नेण्याचे काम शुभांगीताई घरत करत आहेत.त्यांच्या समवेत घरत परिवारातील महिला भगिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

# खोडाळा गावात यंदाही रंगणार जगदंबा उत्सव

## यंदाचे हे तीसरे वर्ष,बाजार पेठेला येणार रौनक

## चलनावढीने व्यापा-यांची चांदी



**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर/सौरभ कामडी**

मोखाडा तालुक्याला जगदंबा उत्सवाची एक ऐतिहासिक परंपरा आहे. त्या धर्तीवरच खोडाळा येथील जगदंबा ( बोहाडा ) उत्सव तालुक्यात चिरपरिचित होता. बरेच वर्ष खंडीत असलेला खोडाळ्याचा जगदंबा उत्सव हा जुन्या जाणत्याच्या नेतृत्वात एक अनोखी झळाली घेऊन नव्याने तीन वर्षापासून साजरा होत आहे. त्यामुळे बाजारपेठेला यात्रेचे स्वरूप आले असुन चलन वलन वाढल्याने रौनक आली असुन एकूणच व्यापारी वर्ग सुखावला असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मोखाडा तालुक्याची ओळख, शेकडो वर्षांची आदिवासींची परंपरा व संस्कृतीचे प्रतिक असलेला जगदंबा मातेचा उत्सव अर्थात बोहाडा खोडाळा शहरातही 2 , 3 , 4 मे ला साजरा होत आहे. जगदंबा उत्सव अर्थात बोहाडा राज्याच्या प्रत्येक आदिवासी बहुल भागात साजरा केला जातो, परंतु पूर्वीचा ठाणे व आताचा पालघर हा आदिवासी जिल्हा असल्याने जव्हार, मोखाडा, विक्रमगड या 99 टक्के आदिवासी समाज असलेल्या तालुक्यात विविध गांवपाड्यात सुध्दा जगदंबेचा उत्सव असलेला बोहाडा आजही मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आदिवासी कला व संस्कृतीची शेकडो वर्षाची परंपरा ही सर्व धार्मियाकडून बंधू भावाने जपली जाते.हेच या उत्सवाचे फलित आहे. खोडाळा येथील उत्सव समितीचे अध्यक्ष उमेश येलमामे, उपाध्यक्ष प्रकाश दोंदे, दिनकर पाटील,यांचेसह उत्सव समिती आणि ग्रामस्थ मंडळींनी उत्सवाचे नियोजन उत्तम केले असुन जगदंबा उत्सव शांततेच्या वातावरणात संपन्न करण्यावर भर दिलेला आहे.

रात्रीच्या वेळेस या उत्सवास प्रारंभ होतो, विविध देवदेवतांचे मुखवटे व वेष परीधान करून आदिवासींच्या पारंपारीक संबळ वाद्याच्या तालावर एका विशिष्ट पध्दतीनेच ही सोंगे नाचविली जातात. भक्तांच्या हातातील टेंभ्याच्या उजेडात ही विविध सोंगे पहाटेपर्यत नाचविली जातात, देव-दानवांचे युध्द व हनुमानाच्या शेपटीला अग्नी लावून नाचविलेले सोंग हे बोहाड्याची रंगत असते. तर दशानन रावण हे जगदंबा उत्सवाचे प्रमुख आकर्षण असते.

जगदंबा उत्सवाच्या पहिल्या दिवशी श्री गजाननाचे विधिवत पूजन व मिरवणूक अर्थात थाप रात्री 9 ते 12 वाजेपर्यत, दुसऱ्या दिवशी लहान बोहाडा, तिसऱ्या दिवशी 4 मे ला मोठा बोहाडा रात्रभर तर 5 मे ला देवीची महापूजा सकाळी 9 वाजता करण्यात येणार आहे. त्यानंतर गावाच्या बाजारपेठेतुन महिषासुर व देवीचे युध्द आणि मिरवणूक होऊन उत्सवाची सांगता होणार आहे.

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

परळी (प्रतिनिधी)दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र दिन,कामगार दिन,तसेच मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला .याप्रसंगी राष्ट्र गीता बरोबरच 'गरजा महाराष्ट्र माझा हे राज्य गीत गावून राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना देण्यात आली. ध्वजारोहण शाळेचे प्राचार्य डॉ. श्रीकांत पाटील यांच्या हस्ते कण्यात आले, यावेळी शाळेचे सर्वशिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्र दिनी विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते तसेच आमचे मार्गदर्शक मा श्री.किरण गित्ते साहेब सचिव त्रिपुरा सरकार यांनी सर्व शिक्षकांना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिना, कामगार दिनाच्या तसेच मराठी राज्य भाषा दिनाच्या शुभेच्छा देत नविन वार्षिक शैक्षणिक नियोजनासाठी मार्गदर्शन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# चिमुकल्याने पैसाचा गल्ला केला बजरंग सोनवणेकडे सुपूर्द

## सायकलसाठी जमविलेले पैसे निवडणूक खर्चाला दिल्याने बजरंग बप्पा भारावले

**वादळवार्ता/तागडखेल**

सायकल घेण्यासाठी चिमुकल्याने पैसे जमा केलेला गल्ला उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्याकडे सुपूर्द करीत निवडणूक खर्चासाठी हे कामी येतील. तुम्ही निवडून आल्यानंतर सायकल घेईन, विकासासाठी तुमच्यासारख्या शेतकरी पुत्राने निवडणूक जिंकावी . अशी भावना व प्रेम आष्टी तालुक्यातील तागडखेल गावातील चिमुकल्याने त्यांच्या प्रति व्यक्त केल्याने बजरंग बप्पा भारावून गेले.

आष्टी तालुक्यातील तागडखेल येथील शौकत पठाण यांचा इयत्ता सहावीच्या वर्गात शिकत असलेला मुलगा आयान पठाण याची शाळेत जाण्यासाठी सायकल घेण्याची इच्छा होती. म्हणून तो आई - वडिलांनी खाऊसाठी दिलेले पैसे एका गल्ल्यात जमा करीत होता. तर तो हे पैसे आपल्या आई - वडिलांच्या परस्पर गल्ल्यात जमा करून ठेवत होता. ३० एप्रिल रोजी बजरंग बप्पा सोनवणे हे माजी आमदार साहेबराव दरेकर, पक्षाचे आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे, उद्धव दरेकर, डॉ. महेश नाथ, राम काका, अमोलराजे तरटे, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, अशोक मस्के यांच्यासह तागडखेल येथे मतदारांच्या गाठीभेटी घेत संवाद साधत होते. याचवेळी आयान पठाण याने घरात पळत जावून त्याने जमविलेला पैसाचा गल्ला आणून बजरंग बप्पा सोनवणे यांच्याकडे सुपूर्द केला. त्याने बजरंग बप्पांना हे पैसे तुम्हाला निवडणुकीत खर्च करता येतील, तुमच्या सारखा विकासाची जाण असलेला शेतकरी पुत्र जिंकायला हवा. तुम्ही निवडून आल्यास मी तुमच्याकडून सायकल घेईल. अशा प्रकारची भावना व्यक्त करीत या चिमुकल्यास मताचा अधिकार नसला तरी त्याने त्यांच्या प्रति व्यक्त केलेली भावना व प्रेम पाहून बजरंग बप्पा हे भारावून गेले. एकीकडे सर्व सामान्य जनता खांद्यावर घेऊन बैलगाडीतून व दुचाकीवरून मिरवणूक काढीत उस्फूर्तपणे स्वागत करीत पाठीशी उभी राहत असल्याचे पाहून त्यांच्या आत्मविश्वासाला बळ मिळत आहे. ते विजयी व्हावेत, अशी सर्व सामान्य जनतेची इच्छा असताना चिमुकल्याने केलेली छोटीशी मदत ही त्यांच्यासाठी लाख मोलाची ठरली आहे. दरम्यान, या लोकसभेच्या निवडणुकीत प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या बाजूने पालकमंत्री, खासदार, आमदार, नेत्यांची फौज असताना सर्व सामान्य जनता त्यांच्या पाठीशी उभी राहिल्याने त्यांची ही निवडणूक जनतेने हातात घेतल्याचे चित्र दिसून येत आहे. तर दुसरीकडे मतदार नेत्यांचे ऐकून घ्यायला तयार नसल्याने विरोधक हतबल झाले आहेत.

# अमोल तरटे, अण्णासाहेब चौधरींच्या प्रवेशाने शरद पवार गटाची ताकद वाढली

## आष्टी तालुक्यात भाजप, अजित पवार गटाला खिंडार

**वादळवार्ता/आष्टी**
भाजपचे अमोल तरटे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आष्टीचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब चौधरी यांच्यासह सुनील नाथ, अशोक मस्के यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशाने आष्टी तालुक्यात भाजप, अजित पवार गटाला खिंडार पडले असून शरद पवार गटाची ताकद वाढली आहे. त्यांच्या प्रवेशाबद्दल सावरगाव कोठी येथे इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी त्यांचा सत्कार करीत पक्षात स्वागत केले.

आष्टी तालुक्यातील सावरगाव येथील भाजपचे कार्यकर्ते अमोलराजे तरटे, आष्टीचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, अशोक मस्के यांनी आपापल्या पक्षाला सोडचिठ्ठी देत शरदचंद्र पवार यांचे नेतृत्व स्वीकारून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे आष्टी व बीड जिल्ह्यात शरद पवार ताकद वाढली असून भाजप आणि अजित पवार गटाला खिंडार पडले आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे आष्टी तालुक्यातील मच्छिंद्रनाथ गडाच्या दर्शनाला जात असताना त्यांनी सावरगाव येथे अमोलराजे तरटे, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, अशोक मस्के यांचा पक्ष प्रवेश केल्याबद्दल सत्कार केला. यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर, पक्षाचे विधानसभा अध्यक्ष राम खाडे, उद्धव दरेकर, डॉ. महेश नाथ, राम काका यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

### शरदचंद्र पवारांचे विचार तळागाळापर्यंत पोहचवू

आम्ही जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांचे विचार वाड्या, वस्त्या, तांड्यापर्यंत पोहचवून शेतकऱ्यांचे जाणते राजे शरदचंद्र पवार यांचे हात बळकट करू व गद्धारांना त्यांची जागा दाखवून देऊ. लोकसभा निवडणुकीत बजरंग सोनवणे यांना मते मिळवून देण्यासाठी जीवाचे रान करू असा विश्वास अमोल राजे तरटे, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, अशोक मस्के यांनी दिला.

## रामदासजी आठवले यांच्या विशेष सहभागात कॅन्टोन्मेंट विधानसभेत उत्स्फूर्त रॅली

दैनिक वादळ वार्ता पुणे /पंकज भंडारी
पुणे लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचा उमेदवार म्हणून प्रचारार्थ काढलेल्या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माझे मार्गदर्शक, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री, आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.श्री. रामदासजी आठवले साहेब यांचा विशेष सहभाग होता. कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादासह मतदारांचाही तितकाच भरगोस प्रतिसाद लाभला. याप्रसंगी या रॅलीला कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. सुनीलभाऊ कांबळे, विधानसभा अध्यक्ष सुशांत निगडे, मतदारसंघाचे सर्व सरचिटणीस, भाजपा पुणे शहर उपाध्यक्ष संदीप लडकत, भाजपा युवा मोर्चा शहर सरचिटणीस आशिष सुर्वे, कॅन्टोन्मेंट भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष



सनी मेमाणे,मतदारसंघाचे माजी अध्यक्ष जयप्रकाश पुरोहित,स्थानिक नगरसेवक उमेश गायकवाड, सौ.मंगलाताई मंत्री, हिमालीताई कांबळे, प्रतिक देसरडा हे उपस्थित होते. रॅलीची सुरुवात प्रभाग क्रमांक 20 ताडीवाला रोड येथून झाली. त्यानंतर प्रायव्हेट रोड, लडकतवाडी,लोकसेवा वसाहत,बुद्ध विहार,ढोले पाटील रोड, बोट क्लब रोड, बंडगार्डन, चंचल मंडळ, कवडेवाडी, दरोडे मळा, केरबावस्ती, मदारी वस्ती, रेणुका वस्ती,संत गाडगे महाराज वसाहत, येथे समारोप झाला. समवेत पुणे शहर व पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे नगरसेवक, भारतीय जनता पार्टी शिवसेना मनसे आणि आरपीआयचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.



श्री साई क्लिनिक चा डॉ. विनोद बहिर यांचा वाढदिवसाच्या निमित्त शुभेच्छा देताना तेजस अर्बन बँकेचे मॅनेजर ठोसर सर, बापू मोहोळकर , सुनिल सानसळे , विशाल लोखंडे , भरत कवठेकर ,पत्रकार गोकुळ इंगोले व या वेळी मित्रपरिवार उपस्थित होता



**भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे बीड जिल्हाध्यक्ष व निर्भीड पत्रकार संघाचे माजलगाव तालुका अध्यक्ष परमेश्वर सोळंके यांना वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा......... शुभेच्छुक.. संघर्ष लढा पत्रकार संघ माजलगाव**

## महाराष्ट्रातील पहिला उत्कृष्ट दाढी मिशी फॅशन शो उत्साहात

**दैनिक वादळ वार्ता पुणे/ पंकज भंडारी**
महाराष्ट्रातील पहिला उत्कृष्ट दाढी मिशी फॅशन शो २०२४ नुकताच पवना डॅम धायरी पुणे येथील फ्लेवर्स पवना कॅम्पियन येथे पार पडला. या स्पर्धेचे आयोजन मिस्टर इंडिया २०१९ ,प्रेसिडेंट ऑफ महाराष्ट्र बियर्ड सागर भावसार यांनी केले होते. एकूण वीस स्पर्धकांनी यात सहभाग घेतला होता इंदोरच्या एकलव्य सिंगने प्रथम क्रमांक पटकावला उत्कृष्ट दाढी दीपक चौकसे ,उत्कृष्ट मिशी किरण भुसारे, उत्कृष्ट शॉर्ट बियर्ड मंगेश ठाकूर, (महाराष्ट्र ),उत्कृष्ट वी व्यक्तिमत्व राजीव सोनी (हरियाणा), उत्कृष्ट आत्मविश्वास नागराज नादकट्टी (हुबळी) ,उत्कृष्ट वेशभूषा प्रशांत वर्मा (राजस्थान) यांना किताब मिळाले आहेत. स्पर्धेत ६ टायटल विनर ठरले. मध्य प्रदेश ,हरियाणा ,राजस्थान, तेलंगणा ,कर्नाटक, मुंबई ,पुणे अशा राज्यात या



राज्यातील सर्व विभागातून स्पर्धक आले होते. हा एक आगळा वेगळा फॅशन शो ठरला, कारण यामध्ये स्पर्धेचे स्वरूप बोट रेस ,द टग ऑफ वॉर,लाकडी ओंडका, नेमबाजी रॅम वॉक ( सांस्कृतिक व आधुनिक फेरी), प्रश्नोत्तरे अशा स्वरूपाचे असल्यामुळे ते एक वैशिष्ट्य ठरले. मुख्य परीक्षक म्हणून मिसेस इंडिया, अभिनेत्री,मॉडेल स्वाती हनमघर तसेच माजी आर्मी कमांडो , अभिनेता डी. जगदीश चंद्रा , बिएर्ड इन्फ्लुएन्सर पारस राठोड यांनी केले. सामाजिक कार्यकर्त्या, नवदुर्गा पुरस्कृत ,योग शिक्षिका लक्ष्मी भावसार, रुपेश नायक ( तेलंगणा) जगदीश मकवाना उपस्थित होते. स्पर्धेचे सूत्रसंचालन ऋषी यादव यांनी केले.-सुलोचना गारे गोमघर ग्रामपंचायत सरपंच

# शिवसेनेचे उमेदवार डॉ.श्रीकांत शिंदे यांचा उमेदवारी अर्ज मोठ्या उत्साहात आणि महाविराट रॅली काढून दाखल




**वादळ वार्ता /कल्याण**
कल्याण लोकसभा मतदारसंघाचे महायुतीतील शिवसेनेचे उमेदवार डॉ.श्रीकांत शिंदे यांचा उमेदवारी अर्ज आज मोठ्या उत्साहात आणि महाविराट रॅली काढून दाखल करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील उपस्थित होते. डोंबिवलीतील गणेश मंदिरातील श्री गणरायाचे आशिर्वाद घेऊन गणेश मंदिर ते वै.ह.भ.प.सावळाराम महाराज क्रीडा संकुल अशी अतिभव्य रॅली काढण्यात आली या रॅलीमध्ये कल्याण-डोंबिवलीमधील हजारो शिवसैनिक, महायुतीच्या सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच कल्याण लोकसभा मतदारसंघातील नागरिक स्वतःहून बहुसंख्येने सहभागी झाले होते. या रॅलीमध्ये राज्याच्या कलासंस्कृतीचे दर्शन घडवणारी अनेक कलाकारही सहभागी झाले होते. जागोजागी विजयी जयघोष करत तसेच डॉ.श्रीकांत शिंदे यांना शुभेच्छा देत नागरिकांनी त्यांना प्रचंड बहुमताने विजयी होण्यासाठी शुभाशीर्वाद दिले. यानंतर पी.सावळाराम सभागृहात शिंदे कुटूंबियांच्या उपस्थितीत त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. यानंतर झालेल्या सभेला संबोधित करताना आजची ही विराट शोभायात्रा ही गेली दहा वर्षे डॉ.श्रीकांत शिंदे यांनी केलेल्या कामाची पोचपावती आहे. आपण सर्वजण आवर्जून त्याला पाठींबा देण्यासाठी आल्याबद्दल उपस्थित नागरिकांचे आभार मानले. तसेच ही फक्त जनसभा नसून डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या विजयाची नांदी ठरावी अशी अपेक्षा व्यक्त केली. आपल्या सर्वांचा साथीने आणि केलेल्या कामांच्या जोरावर ते विजयी नक्कीच हॅट्रिक साधतील असा विश्वास यावेळी व्यक्त केला. यावेळी माझे वडील संभाजी शिंदे, पत्नी सौ.लता शिंदे, सून सौ.वृषाली शिंदे, नातू रुद्रांश तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार राजू पाटील, आमदार कुमार आयलानी, आमदार डॉ.बालाजी किणीकर, महायुतीचे ठाणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, राजेश कदम, डोंबिवली शहरप्रमुख राजेश मोरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, राष्ट्रवादीचे ठाणे शहर (जिल्हा) अध्यक्ष आनंद परांजपे, अंबरनाथचे माजी शहराध्यक्ष सुनील चौधरी, कल्याण शहरप्रमुख रवी पाटील तसेच महायुतील सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कल्याण लोकसभा मतदारसंघातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )